सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज


https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८२ | बुधवार, दि. २५ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com






**श्री. प्रवीण पाटील**
अमळनेर



**श्री. गोकुळ आनंदा पाटील**
केंद्रप्रमुख प. सं., अमळनेर



**श्री. केशव पुराणिक**
पुरोहित



**श्री. ज्ञानेश्वर संदानशिव**
अमळनेर

**झहीर खानच्या घरचा गुढीपाडवा!**
पान २ वर...



अमळनेर : सिंधी कॉलनीजवळील अपघातानंतर संतप्त जमावाने केलेला रास्तारोको.

# सिंधी कॉलनीजवळ क्रेनच्या धडकेत वृद्धाचा जागीच मृत्यू

## संतप्त नागरिकांचा अमळनेर- चोपडा रस्त्यावर रास्तारोको

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भरधाव क्रेनच्या धडेकत एका वृद्धाचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सकाळी अकराच्या सुमारास चोपडा रस्त्यावरील सिंधी कॉलनीजवळ घडली. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी काही काळ रास्तारोको केला. अवजड वाहनांमुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. याबाबत त्यांना आळा घालण्याची गरज आहे.

जयराम धर्मानी (वय ७२) बाजारातून घरी येत होते. त्यावेळी मागून येणाऱ्या क्रेनने त्यांना जोरदार धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर क्रेनचालक पसार झाला. त्यानंतर संतप्त जमावाने चोपडा- अमळनेर रस्त्यावर रास्तारोको करून काही काळ वाहतूक अडवून ठेवली. चोपडा- अमळनेर रस्त्यावर गतिरोधक नाहीत. रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. परिणामी अपघातांची गेल्या महिनाभरापासून मालिकाच सुरू आहे, असा संताप नागरिकांनी व्यक्त केला. संतप्त नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पालिका प्रशासनाचा निषेध केला आहे. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.

### अवजड वाहनांचे करायचे काय?

अमळनेर- चोपडा, चोपडा- धुळे, अमळनेर- नरडाणा, अमळनेर- पारोळा आदी मुख्य रस्त्यांवरून अवजड वाहनांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यात वाळूने भरलेल्या डंपरचा तर सुळसुळाट आहे. भरधाव वाहनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेकांना प्राण गमवावे लागले आहे. याकडे प्रादेशिक परिवहन विभागाचे दूर्लक्ष आहे. अवजड वाहनांचे करायचे तरी काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. याकडे संबंधित विभागाने व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची गरज आहे. अवजड वाहनांना पर्यायी मार्ग निवडून वाहतूक वळविण्याची मागणी होत आहे.

# ताडेपुराजवळील स्मशानभूमीत तत्काळ सोयीसुविधा उपलब्ध करा

## घनश्याम पाटील यांचे पालिकेस निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील चोपडा रस्त्यावरील ताडेपुरा स्मशानभूमीची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या स्मशानभूमीत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पालिकेचे माजी आरोग्य सभापती घनश्याम पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन दिले आहे. तसेच त्यांनी शिवसेनेचे नेते माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्याशीही संपर्क साधून लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे.

घनश्याम पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की ताडेपुरा सार्वजनिक स्मशानभूमी येथे मी सोमवार, दि. २३ मार्च रोजी अंत्यसंस्कारासाठी गेलो होतो. त्यावेळी मी प्रत्यक्ष अनुभव घेतला असता जुन्या अंत्यविधी शेडखाली असलेल्या तीनही बेडवर एकाच दिवसात काही अंतराने अंत्यविधी झालेले होते. मात्र, त्या तीनही बेडचे कठडे तुटलेले आहेत. नवीन अंत्यविधी शेडचे सुरु असलेले कामही अपूर्ण आहेत. अंत्यविधी बेडची तरतूद नसल्याने तात्पुरते लोखंडी सळई व तारच्या सहाय्याने बेड तयार करण्यात आले आहेत. या सर्व प्रकारामुळे अंत्यविधी करतांना मृताच्या नातेवाईकांना व तेथील कर्मचाऱ्यांना मोठ्या कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मृतदेहाची अवहेलना आहे. कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली असता पालिका व संबंधित कामाचे मक्तेदार यांच्यात किरकोळ तांत्रिक वाद सुरु आहेत, अशी माहिती मिळाली. मात्र, या सर्व प्रकारामुळे अंत्यविधी करतांना होणारी अडचण हिंदू धर्माच्या अंत्यविधी परंपरेनुसार मृताच्या नातेवाईकांना व सामान्य लोकांना प्रचंड वेदना देणारी आहे. अमळनेर शहराच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेला न शोभणारी आहे. नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालावे. स्मशानभूमीत लवकरात लवकर सर्व सोयी उपलब्ध करून द्याव्यात. याबाबत शिवसेनेचे नेते माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांना देखील मोबाईलवर संपर्क साधला आहे. मक्तेदार व पालिकेत समन्वय साधून लक्ष घालण्याची विनंती केली आहे. यावेळी अक्षय चव्हाण, हर्षल महाजन, उज्वल मोरे उपस्थित होते.

# बोहरा येथे महिलेच्या विनयभंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील बोहरा येथे एका महिलेचा शिवीगाळ, मारहाण करून विनयभंग झाला आहे. ही घटना सोमवार, दि. २३ मार्च रोजी दुपारी १२ वाजेचा सुमारास घडली. पोलिसांनी सांगितले, की बोहरा येथील ४५ वर्षीय महिला घराबाहेर शेजारणीशी बोलत होती. त्यावेळी गावातील पवन शिवाजी पाटील हा आला. शिवीगाळ करू लागला. महिलेने जाब विचारला असता तो धावून आला. महिला घाबरून घरात पळून गेली. त्यावेळी त्याने दरवाज्यावर हात मारत घरात घुसून डावा हात पकडला. महिलेला चापटबुक्क्यांनी मारहाण करून विनयभंगकेला. यावेळी शेजाऱ्यांनी महिलेची सुटका केली. महिलेचा पती घरी आल्यावर महिलेने मारवड पोलीस ठाणे गाठून पवन शिवाजी पाटील याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक फौजदार संजय पाटील तपास करीत आहेत.

# पेट्रोल-डिझेल टंचाईबाबत अफवा : जिल्हाधिकारी रोहन घुगे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जळगाव शहरातील काही पेट्रोल पंपांवर पेट्रोल संपल्याबाबत अथवा कमी असल्याबाबत अफवा पसरत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती व गोंधळ निर्माण झाला आहे. काही ठिकाणी गर्दी होत आहे. मात्र, या सर्व अफवा असून, पेट्रोल व डिझेलची कुठलीही टंचाई नाही. नागरिकांनी भीती बाळगू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

याबाबत जिल्हा प्रशासनाने पत्र जाहीर केले आहे. या पत्रात म्हटले आहे, जळगाव शहर तसेच जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या पुरवठा सुरळीत सुरू असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. संबंधित यंत्रणांकडून सतत देखरेख ठेवली जात आहे.

नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधन साठवण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी जास्त प्रमाणात पेट्रोल-डिझेल खरेदी करू नये. तसेच पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, अन्यथा वाहतूक कोंडी व कायदा- सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवावा. अफवा पसरविणे किंवा चुकीची माहिती प्रसारित करणे हा दंडनीय गुन्हा असून अशा कृत्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

कोणतीही शंका असल्यास नागरिकांनी अधिकृत शासकीय माध्यमांद्वारेच माहिती घ्यावी. नागरिकांनी शांतता, संयम व सहकार्य करावे. जळगाव शहरासह संपूर्ण जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलबाबत प्रशासन लक्ष ठेवून आहे. अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर रांगा लागत आहेत. याबाबत पोलिसांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व तालुक्यातील तहसीलदारांनाही याबाबत माहिती देण्यात आली आहे. नागरिकांनी अडचणी असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही प्रशासनाने जाहीर केले आहे.

# मराठा समाज महिला मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षापदी सौ. सुलोचनाताई वाघ, सचिवपदी सौ. कमलअक्का पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मराठा समाज महिला मंडळाची रविवार, दि. २२ मार्च रोजी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी सुलोचनाताई वाघ (पाटील), उपाध्यक्षपदी मंगल पाटील, सौ. भारतीताई पाटील व सचिवपदी सौ. कमलअक्का पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली.

मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. रेखाताई पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. जयश्रीताई पाटील, अध्यक्षा सौ. शीलाताई पाटील यांनी दीपप्रज्वलन केले. सौ. तिलोत्तमाताई पाटील यांनी मंडळाच्या दहा वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. चोपडा येथील पंकज महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रेखाताई पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन केले. खजिनदार सौ. पद्मजा पाटील यांनी मागील वर्षाचा आर्थिक वर्षाचा अहवाल सादर केला. त्यानंतर २०२६ ची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

मंडळाचे परंपरेनुसार दरवर्षी महिलादिन कार्यक्रमात वर्षभरात उल्लेखनीय कार्य केलेल्या तसेच विविध पदांवर निवड झालेल्या विविध बक्षीसपात्र मराठा समाजातील भगिनींचा सत्कार करण्यात आला. यात पिंपळे येथील सरपंच सौ. वर्षा पाटील, नवनिर्वाचित नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील व सौ. स्वप्ना पाटील, कॉँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ, खा. शी. मंडळात निवडून आलेल्या संचालिका सौ. लीनाताई पाटील व उपाध्यक्षा श्रीमती माधुरीताई पाटील यांच्यासह सौ. कामिनी पवार, सौ. सुनिता पाटील, सौ. अनिता काळे, सौ. पूजा पाटील, सौ. रजनी पाटील, सौ. पद्मजा पाटील, डॉ. भारती पाटील, सौ. रूपाली पाटील, सौ. पल्लवी पाटील, सौ. योगेश्वरी पाटील, सौ. श्वेता पाटील, प्रा. डॉ. नलिनी पाटील, सौ. वैशाली निकम, सौ. ज्योती पाटील, सौ. सुदर्शना पाटील, सौ. माधुरी देशमुख, सौ. सुवर्णा पाटील, सौ वैशाली पाटील, राणी लक्ष्मीबाई ग्रुपच्या सौ. ज्योती पवार, सौ. माधुरी पाटील, सौ. पूर्वा देसले, सौ. पूनम पाटील, सौ. मनीषा महाले यांचा विशेष प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. सौ. भारतीताई पाटील, सौ. मनीषाताई पाटील व सौ. रागिनीताई महाले यांनी सूत्रसंचालन केले. सौ. लीनाताई पाटील यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. यशस्वीतेसाठी मंडळाच्या संचालिक सौ. सुनीताताई पाटील, सौ. प्रभा पाटील यांनी सहकार्य केले.

सौ. सुलोचनाताई पाटील यांनी अध्यक्षापदी निवड झाल्याबद्दल ऋणनिर्देश केला. मावळत्या अध्यक्षा सौ. शीलाताई पाटील यांनी आभार मानले.



*अमळनेर : मराठा महिला समाजाच्या बैठकीस उपस्थित नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ, उपाध्यक्षा मंगल पाटील, सौ. भारती पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. जयश्रीताई पाटील आदी.*

### नवीन कार्यकारिणी अशी

अध्यक्षा- सौ. सुलोचनाताई वाघ, उपाध्यक्षा- सौ. मंगलताई पाटील व सौ. भारतीताई पाटील (डी. आर. कन्या शाळा), सचिव- सौ. कमलअक्का पाटील, खजिनदार- सौ. भारतीताई पाटील (आधार संस्था), सदस्या- सौ. स्वप्नाताई पाटील, सौ. राजश्रीपाटील, सौ. सविताताई आहेर, प्रा. नलिनीताई पाटील, सौ. गायत्रीताई भदाणे, सौ. कृपालीताई पाटील व सौ. दीपिकाताई सोनवणे.



## संपादकीय

# दबाव वाढता वाढे..!

पश्चिम आशियातील संघर्षामुळे लाखो भारतीय अडकले आहेतच. मात्र, देशांतर्गतही इंधनाचे संकट वाढत जाण्याची चाहूल लागली आहे. सर्व भारतीयांचे संरक्षण केले जाईल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा आत्मनिर्भरता या मुद्द्यावर भर दिला आहे. विविध बाजूंनी होणाऱ्या खऱ्या- खोट्या बातम्यांचा मारा आणि युद्ध थांबण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नसल्यामुळे कदाचित परिस्थिती हाताबाहेर तर जाणार नाही ना, अशी शंका डोकावू लागली आहे. त्याचा परिणाम अर्थातच दबाव वाढण्यात होतो आहे. खाडीयुद्धात अडकलेल्या कोणत्याही भारतीयाला वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे म्हणणाऱ्या सरकारवर विश्वास आहे व सरकार ते कर्तव्य चोख बजावेलही, याबाबत शंका नाही. प्रश्न आहे तो आता देशांतर्गत जी समस्या निर्माण होणार आहे विशेषतः स्वयंपाकाच्या गॅसची. त्याबाबत सरकार काय करू शकणार आहे, याचा केवळ बोलून अथवा सांगून अथवा दिलासा देऊन संपवता येण्यासारखा विषय नाही याची सरकारलाही कल्पना आहे. दिवसागणिक युद्धाच्या वातावरणामुळे जे अनिश्चितता वाढत चालली आहे त्याची छाया आता केवळ सरकारमधील लोकांच्याच नव्हे, तर सर्वसामान्यांच्याही चेहऱ्यावर उमटताना दिसते आहे. संघर्ष लवकरच मिटला नाही आणि इंधन पुरवठ्याची साखळी पूर्ववत सुरू झाली नाही तर काय ही चिंता सतावत आहे. तसेच झाले तर पर्यायी व्यवस्था आणि उपाय काय आहेत हे अजूनही अनुत्तरीत आहे.

देशात कशाचीच कमतरता नसल्याचे सांगण्यात येते आहे. पण बहुतेक महानगरांमधील चित्र पुरेसे बोलके आहे. अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबलेला आहे. त्यांच्याकडे ती तजवीज होती त्यावर त्यांनी आजपर्यंतचे म्हणजे आठ-दहा दिवस ढकलले. पुढे काय हा प्रश्न हॉटेल व्यावसायिकांसमोर उभा ठाकला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने एलपीजीचे उत्पादन वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. रशियाकडून तीन कोटी बॅरल कच्चे तेल खरेदी केले गेले आहे. अर्थात या मागील आठवड्यातील घडामोडी आहेत. त्यानंतर तीन जहाजे भारताच्या गुजरातमध्ये दाखल झाली असली, तरी हे फार आश्वासक असल्याचे आज म्हणता येऊ शकणार नाही. बंद असल्यामुळे अन्य मार्गानेही तेल मागविण्याचा प्रयत्न केला जातो आहे. इतरही धावपळ सुरू असली, तरी एक गोष्ट समजण्यासारखी आहे की युद्धाची व्याप्ती ज्या प्रमाणात वाढली आहे त्याचा प्रभाव कुठल्या ना कुठल्या स्वरूपात पडणार आहेच व त्याची झळी सोसावी लागणार आहे. भारतासारखे जे देश आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त आयातीवरच अवलंबून आहेत त्यांच्यासाठी हा परीक्षेचाच काळ आहे. आत्मनिर्भर होण्याच्या केवळ चर्चा करून भागणार नाही, तर भविष्यासाठी तजवीज करण्याकरिता पुढाकारही घ्यावा लागेल. सरकार खुलेपणाने मान्य करत नसले अथवा करू शकत नसले तरी चिंतेच्या रेषा चेहऱ्यावर दिसू लागल्या आहेत. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार शुद्धीकरण प्रकल्प आपल्या पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. असे असूनही गॅसचे संकट आवाक्यात अथवा आटोक्यात आलेले नाही. संकटात पोळले जाणाऱ्यांचा जसा एक वर्ग असतो तसा त्याच काळात आपापली पोळी भाजणाऱ्यांचाही म्हणजेच संकटाचाही व्यापार करणारा एक वर्ग असतो. अनिश्चिततेच्या काळात त्याचे फावतेच. पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक नियम लागू केले गेले आहेत.

तथापि ठिकठिकाणी छापेमारीही केली जात आहे व मोठ्या प्रमाणावर सिलिंडर जप्त होताना दिसत आहेत. याचाच अर्थ काळाबाजार सुरू आहे व त्याला रोखण्यात यश आले नाही किंवा तो करणाऱ्यांना अद्याप जरब बसवलेली नाही. लहान हॉटेल्स, ढाबे, छोटे स्टॉल अगदी क्वचितच सुरू दिसत आहेत किंवा मेनू बदलून सुरू ठेवले जात आहेत. यामुळे केवळ खवय्यांची गैरसोय होईल व त्यांनी काही दिवस जिभेचे चोचले थांबवावे, असे म्हणून हा विषय फेटाळता येत नाही. त्याचे कारण हॉटेल व्यवसायाशी निगडीत लाखो लोक आणि त्यांचे कुटुंबीय आहेत व ते पोळले जात आहेत. ज्यांचा पूर्णवेळ रोजगारच हा आहे त्यांच्या रोजगारावर तर संकट आहेच. उपासमारीचे संकटही त्यांच्यासमोर आहे. पश्चिम आशियातील संघर्ष संपला, असा सकारात्मक विचार करायचा झाल्यास सगळे पूर्वपदावर येण्यास काही काळ लागू शकतो. इराणने केवळ हुर्मुझचा मार्ग खुला केला किंवा त्यांना करावा लागला तरी सगळे तेथेच संपत नाही, तर ज्या ठिकाणाहून माल आणला जातो आहे तेथे नेमके किती नुकसान झाले आहे व त्यातून बाहेर पडायला त्यांना किती वेळ लागेल यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतील. अशा अनिश्चित भविष्याच्या भरवशावर भारतासारखा देश आपल्या गॅस कनेक्शनधारकांना वाऱ्यावर सोडू शकत नाही. सध्या सरकारला पीएनजीत आशेचा किरण दिसतो आहे. राज्यांनी पीएनजीचा वापर वाढवावा, यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्याकरिताही पीएनजीसी संबंधित पायाभूत सुविधा बळकट करावी लागतील. लहान शहरांमधील कनेक्शन वाढवावे लागतील. दबाव आहे मात्र त्याचा सामना करत आता भविष्याचा विचार करत मार्गही काढावे लागतील.

# सप्तशृंगी गडावरील चैत्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

## उद्यापासून प्रारंभ : भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी विविध विभागांची जय्यत तयारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नाशिक : वणी गडावर येत्या २६ मार्चपासून सप्तशृंगी देवी चैत्रोत्सव सुरू होत आहे. त्यानिमित्त गडावर येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रशासन व ट्रस्टतर्फे सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गडावर व पायथ्याशी आरोग्य विभागातर्फे वैद्यकीय पथके, प्राथमिक उपचार केंद्रे व रुग्णवाहिका सेवा २४ तास सज्ज ठेवण्यात येणार आहे.

कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवू नये, तीव्र उन्हामुळे आगीसारखी ददैवी घटना घडू नये म्हणून अग्निशमन दल पथक कार्यान्वित करण्यात येणार आहे. भाविकांना देवीचे सहज दर्शन घेता यावे, चोरी-छेडछाडीसारखे गैरप्रकार घडू



नये म्हणून पोलिस विभागातर्फे पुरेसे पोलिस, होमगार्ड तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करून त्यांचे संयुक्त पथक कार्यरत राहणार आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील याबाबत नियोजन करत आहेत. केवळ नाशिक जिल्हाच नव्हे, तर राज्यभरातील वेगवेगळ्या भागांतून भाविक पदयात्रेने व वाहनांनी



> चैत्र महोत्सवातील यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सूक्ष्म नियोजन करण्याचा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार नियोजन सुरू आहे.
> – **आयुष प्रसाद,** जिल्हाधिकारी, नाशिक.

येतात. त्यामुळे गर्दी नियंत्रणासाठी ठिकठिकाणी बॅरिकेडिंग, रांग व्यवस्थापन व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहे. यात्रेत लहान मुले, मुली किंवा वृद्ध व्यक्ती हरवतात. अशा हरवलेल्या व्यक्तींसाठी स्वतंत्र मदत केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे. यात्रेदरम्यान भाविकांसाठी भोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता व वीजपुरवठ्याची योग्य व्यवस्था सुनिश्चित करण्यात येत आहे. तसेच स्वच्छतागृहे, योग्य ठिकाणी दिशादर्शक फलके, वृद्ध व अपंग भाविकांसाठी व्हीलचेअर, रॅम्प आदी सुविधांची उपलब्धता केली जात आहे. वैद्यकीय सेवेसाठी कळवण उपजिल्हा रुग्णालयामार्फत वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व आपत्कालीन खाटांची व्यवस्था सज्ज करण्यात आले आहे.

**खासगी वाहनांना गडावर प्रवेश बंद**

सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस विभागातर्फे काटेकोर नियंत्रण ठेवण्याचे नियोजन आहे. वाहतूक व्यवस्थेनुसार खासगी वाहनांना गडावर प्रवेश बंद ठेवण्यात येणार असून, नांदी येथे पार्किंगची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. बसेससाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे. यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्यात येत आहे.

**हे अधिकारी करताहेत नियोजन**

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक जिल्हाधिकारी कश्मिरा संखे, अपर जिल्हाधिकारी (मालेगाव) देवदत्त केकाण, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीकृष्ण देशपांडे, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार (कळवण) रोहिदास वारूळे, कळवण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी वंदना सोनवणे, उमेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता रोहिणी वसावे, भारत संचार निगम लिमिटेडचे निखिल शिरसाठ, 'महावितरण'चे योगेश जगदाळे, सप्तशृंगी निवासिनी ट्रस्टचे प्र. व्यवस्थापक संजय नेरकर, ॲड. ललित निकम यात्रेचे नियोजन करीत आहेत.

# सात महिन्यांपासून नळांना पाण्याचा थेंबही नाही...!

## तीन कुटुंबीयांची वणवण; पालिका प्रशासनाचे दूर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गणेश कॉलनी भागातील तीन कुटुंबीयांच्या नळांना गेल्या सात महिन्यांपासून पाण्याचा थेंबही आलेला नाही. त्यामुळे त्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. मात्र, पाणीपट्टी वसुलीसाठी वसुली कर्मचारी तगादा लावतात. आम्हाला पाणीही मिळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत पालिकेने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

> आम्ही पालिकेचे नियमित कर भरणा करतो. त्यामुळे पालिकेने मूलभूत सुविधा पुरवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. आमचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवावा.
> – **सुधाकर देशमुख,** नागरिक

> पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना तांत्रिक दोष शोधायला सांगितले आहे. तातडीने दुरुस्तीचे काम लावून पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करतो.
> – **कैलास पाटील,**
> सभापती पाणीपुरवठा, अमळनेर पालिका

धुळे रोडवरील गणेश कॉलनीतील सुधाकर देशमुख, प्रवीण रामदास पाटील आणि अरविंद मुंडके या तिन्ही नागरिकांच्या घरी नळांना पिण्याचे पाणीच नाही. गेल्या सात महिन्यांपासून त्यांनी वारंवार तक्रारी करून देखील उपाययोजना होत नाही. नागरिकाना शेजारी पाजारी कडून पिण्याचे पाणी मागावे लागते. त्यामुळे त्यांची वणवण होते. मूलभूत सुविधाच पालिकेकडून मिळत नसल्याने प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, पालिकेचे वसुली कर्मचारी नियमित वसुलीसाठी तगादा लावत आहेत. कर्मचाऱ्यांनी याबाबत अनेकदा खोदूनही नेमकी अडचण कुठे आहे, हे कळेनासे झाले आहे.



# भगवान शिवांचे प्रतिक निलकंठ

**ग्लोबल महातेज वृत्तसेव**

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** निलकंठ Indian Roller

**रंग :** निसर्गाने निलकंठ पक्षाच्या अंगावर निळा, हिरवा, तपकिरी रंगांची उधळण केली आहे. मान निळी व तपकिरी तर पाय फिकट पिवळे.

**चोच :** काळी, लांब, जाड

डोळे : निळे व तपकिरी मिश्रित, गोल, स्थिर, अत्यंत सुंदर

**घरटे :** निलकंठ कड्यांचे घरटे बांधत नाही. मोठ्या झाडांच्या ढोलीत, ओसाड इमारतींमध्ये राहतो.

**अंडी :** मादी एप्रीलमध्ये पांढऱ्या रंगाची तीन चार अंडी घालते.

**भक्ष :** किटक, टोळ, सरडे, भुंगे, अळ्या, साप व उंदीर.

आवाज : सौम्य व कोमल

**इतर वैशिष्ट्ये :** निलकंठ भगवान शिवांचे प्रतिक आहे. हा शुभ शकुनी पक्षी मानला असून विशेष करून दसऱ्याला त्याचे दर्शन घेतात. मोकळ्या स्वच्छ आकाशात निलकंठ उडतांना विलोभनीय दिसतो. निलकंठ भारतभर आढळतो. अमळनेरला श्री मंगळ मंदिर परिसरात, मारवड रस्त्यावर, डुबकी हनुमान जवळ, बोरी नदीत विजेच्या तारांवर बसलेला दिसतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.

# झहीर खानच्या घरचा गुढीपाडवा!

## पुरणपोळ्यांचा नैवेद्य, चांदीचा पाट अन् लेकासोबतचा पहिला सण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

झहीर खान आणि सागरिका घाटगे यांनी त्यांच्या घरी गुढी उभारत गुढीपाडव्याचा सण साजरा केल्याचे फोटो शेअर केले आहेत. १९ मार्चला सगळीकडे गुढीपाडव्याचा सण साजरा झाला. सागरिका आणि झहीर यांनीही सहकुटुंब हा सण साजरा केला. छान घर सजवत गुढी उभारली सागरिकाने पुरणपोळ्या, खीर वरण भात असा सांग्रसंगीत नैवेद्य चांदीच्या ताटात दाखवला आहे. सागरिका आणि झहीरसाठी यंदाचा हा सण अधिक खास होता. कारण ते दोघेही त्यांच्या लेकाबरोबर हा सण साजरा करत होते. सागरिकाने तिच्या आकुती ब्रँडची ही छान गडद गुलाबी रंगाची साडी घातली होती. सागरिकाने घरी देवघराच्या बाहेरच्या बाजूला छान फुलांची सजावट करून गुढीसाठी आरास करण्यात आली होती. अगदी मराठमोळेपणाने सागरिकाने खांद्यावर पदर घेऊन हळद- कुंकू लावत गुढी उभारल्यानंतरचा फोटो शेअर केला आहे. गुढीपाडव्या सणानिमित्त त्यांचा लेक फत्तेहसिंगबरोबर दोघेही छान वेळ घालवतानाचा एक फॅमिली फोटो शेअर केला आहे. फत्तेहसिंग लाडक्या बाबांबरोबर बेडरूममध्ये खेळतानाचा गोड फोटोही सागरिकाने शेअर केला आहे.



# लोखंडापासून निघणाऱ्या मळीपासून रिसायकलिंग

## 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' पुरस्काराने डॉ. विजय जोशी सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : लोखंडापासून निघणाऱ्या मळीचे रिसायकलिंग करून टिकाऊ रस्ते बांधणीचे तंत्रज्ञान विकसीत करणाऱ्या डॉ. विजय जोशी यांना ऑस्ट्रेलियन सरकारने 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' हा मानाचा पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे. भारतातील पद्मश्री पुरस्काराच्या दर्जाचा हा सन्मान आहे.



डॉ. विजय जोशी हे मूळचे ठाण्याचे आहेत. मो. ह. विद्यालयाचे ते माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी व्हीजेटीआयमधून सिव्हिल इंजिनीअरींगची पदवी घेतली. त्यानंतर मास्टर्सही पदवी मिळवली. पुढे टाटा, हमफ्रीज् ॲण्ड ग्लेक्सो (आताची जेकब इंजिनीअरिंग) या उद्योग समूहांमध्ये त्यांनी काम केले. तळोजा येथील दीपक फर्टिलायझर्स येथे कार्यरत असताना २५० फूट उंच प्रिलिंग टॉवरच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. मस्कत येथे काही काळ अनुभव घेतल्यानंतर न्यूझीलंड येथील वास्तव्यात त्यांनी रस्तेबांधणीच्या कामात विशेष प्राविण्य मिळविले. गेल्या २० वर्षांपासून डॉ. जोशी सिडनी येथे स्थायिक आहेत. तेथे स्टील उत्पादनात वाया जाणारे घटक रस्त्यांसाठी कसे वापरता येतील या विषयावरचा प्रबंध पूर्ण करून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. लोखंडापासून निघणाऱ्या मळीचा (स्लॅग) उपयोग करून रस्ते बांधणीचे नवे तंत्र त्यांनी विकसीत केले. ऑस्ट्रेलियातील प्रमुख रस्त्यांसह सिडनी एअरपोर्टच्या तिसऱ्या रनवेसाठी हेच तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. उत्तम दर्जाचे आणि टिकाऊ रस्ते त्यातून बांधले गेले. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे ऑस्ट्रेलियात रस्ते बांधणीतील रेती, खडी आणि अन्य सामग्री अशी मिळून २ कोटी टन (मुंब्रा पारसीक डोंगराएवढे पाच डोंगर भरतील एवठी खडी व माती) एवढ्या प्रचंड नैसर्गिक साधन संपत्तीची बचत झाली. याच कार्यासाठी ऑस्ट्रेलियन सरकारने डॉ. विजय जोशी यांना ' ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया ' हा पुरस्कार प्रदान केला आहे. हे तंत्रज्ञान त्यांनी भारताला विनामोबदला देण्याची तयारी दाखवली होती. मात्र, भारताने याकडे दूर्लक्ष केले.

# जुन्या कपड्यांचे मिळतील हजारो रुपये...!

## रक्कम देण्यासाठी मनुष्य येईल थेट तुमच्या घरी...!!

### भारतात ३ वेबसाइट सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपली आई- आजी जुने कपडे देखील जपून ठेवते आणि नंतर भांडीवाल्याला देऊन त्याबदल्यात एखादे छोटे-मोठे भांडे घेते. हे आपण अनेकदा पाहिले असेल. मात्र, आता असे करण्याची गरज नाही. जर तुमच्याही घरी असे घडत असेल, तर ते त्वरित थांबवा. आता जुन्या कपड्यांमधून तुम्हाला हजारो रुपये मिळू शकतात. जुन्या कपड्यांच्या मोबदलत्यात आता भांडी घेण्याची आवश्यकता नाही. कारण अनेक नवीन पोर्टल्सद्वारे तुम्ही त्यातून पैसे कमावू शकता. या पोर्टल्सवर जुन्या कपड्यांचे रिसायकल किंवा रीसेल केले जाते. ज्यामुळे तुम्हाला चांगली किंमत मिळते. जाणून घेऊया या पोर्टल्सबाबतची माहिती...

पोर्टल्सद्वारे मिळतील हजारो रुपये

Freeup, Gletot आणि Etashee यासारखी नवीन 'री-कॉमर्स' पोर्टल्स जुने फॅशनेबल कपडे, बॅग्स आणि ॲक्सेसरीज विकण्याची सुविधा उपलब्ध देत आहेत. हे ॲप्स फाटलेले कपडे नव्हे, तर चांगल्या स्थितीतील कपडे थेट ग्राहकांना



विकून पैसे कमवण्याची संधी देतात. या पोर्टल्सवर तुम्ही तुमचे जुने कपडे देऊन सहजपणे पैसे मिळवू शकता. स्मार्ट बाजार एक्सचेंज : तुम्ही तुमचे जुने कपडे आणि वर्तमानपत्रे येथे देऊ शकता. त्याबदल्यात तुम्हाला प्रति किलोनुसार एक्सचेंज कूपन मिळतील, ज्याचा वापर तुम्ही खरेदीसाठी करू शकता. Free-up, Gletot, Etashee : हे प्लॅटफॉर्म रीसेलसाठी आहेत. तुम्ही तुमच्या कपड्यांचे फोटो काढून या पोर्टल्सद्वारे थेट पैसे कमावू शकता. चांगली किंमत : जुन्या साड्या किंवा ब्रँडेड कपड्यांना येथे चांगली किंमत मिळू शकते.पर्यावरण संरक्षणः कपडे कचऱ्यात जाण्याचे प्रमाण कमी होते आणि रिसायकलिंगला चालना मिळते.

माणूस तुमच्या दारी

Freeup, Gletot आणि Etashee या तीनही पोर्टल्सपैकी कोणत्याही पोर्टलवर तुम्ही तुमच्या कपड्यांची माहिती देऊ शकता. माहिती सबमिट केल्यानंतर तुमचे कपडे घेण्यासाठी प्रतिनिधी स्वतः तुमच्या घरी येईल. कपडे घेऊन जाईल आणि तुम्हाला लगेच पैसे दिले जातील. ही प्रक्रिया अतिशय सोपी आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# विज्ञानप्रेमींचे प्रेरणास्थान : वसंतराव गोवारीकर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जन्मदिन विशेष

हवामानशास्त्राच्या क्षेत्रात भारताला जागतिक पातळीवर ओळख मिळवून देणारे प्रख्यात शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकर यांचा जन्मदिन हा विज्ञानप्रेमींसाठी प्रेरणादायी दिवस मानला जातो. त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास विज्ञान, संशोधन आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम आपल्याला पाहायला मिळतो. वसंतराव गोवारीकर यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना विज्ञान विषयाची विशेष आवड होती. त्यांनी अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखेत उच्च शिक्षण घेतले आणि नंतर परदेशात जाऊन संशोधन क्षेत्रातही आपली छाप पाडली. त्यांच्या ज्ञानाची व्याप्ती केवळ हवामानशास्त्रापुरती मर्यादित नसून रसायनशास्त्र, अवकाश विज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्येही त्यांनी योगदान दिले.

### इस्रोमधील योगदान

भारतीय अवकाश संशोधन संस्थेत (इस्रो) त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उपग्रह प्रक्षेपण यंत्रणांच्या विकासात त्यांनी केलेले संशोधन अत्यंत मोलाचे ठरले. भारताच्या अवकाश मोहिमांच्या यशामागे त्यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे. त्यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानामुळे भारताने स्वदेशी क्षमतांमध्ये मोठी झेप घेतली.

### हवामान अंदाजातील क्रांती

गोवारीकर यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे भारतातील मान्सून अंदाज पद्धतीत सुधारणा. त्यांनी विकसित केलेल्या 'लाँग रेंज फोरकास्ट' (दीर्घकालीन अंदाज) मॉडेलमुळे पावसाचा अंदाज अधिक अचूक होऊ लागला. भारतासारख्या कृषिप्रधान देशात याचा थेट फायदा शेतकऱ्यांना झाला. त्यांच्या संशोधनामुळे शेती नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि आपत्ती नियंत्रण या क्षेत्रांमध्ये मोठी मदत झाली.

### शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्य

वसंतराव गोवारीकर यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही काम पाहिले. त्यांनी शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला चालना देण्यावर भर दिला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. विज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे यासाठी ते सतत प्रयत्नशील होते.

### पुरस्कार आणि सन्मान

त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले. 'पद्मश्री' आणि 'पद्मभूषण' हे भारत सरकारचे सन्मान त्यांच्या कार्याची साक्ष देतात.

### प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

वसंतराव गोवारीकर हे केवळ शास्त्रज्ञ नव्हते, तर ते एक दूरदृष्टी असलेले विचारवंत होते. विज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी कसा करता येतो, याचे उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले. त्यांची कार्यशैली, चिकाटी आणि देशसेवेची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे. वसंतराव गोवारीकर यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे विज्ञानाच्या माध्यमातून देशसेवेची प्रेरणा घेणे होय. त्यांच्या संशोधनामुळे भारताने हवामानशास्त्र आणि अवकाश विज्ञानात मोठी प्रगती साधली आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. **दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फेही त्यांना भावपूर्ण आदरांजली.**

# कभी फटे-पुराने कपड़ों में गुजारा, आज १५ करोड़ का टर्नओवर

## अब किसान रवींद्र मेटकर को क्यों बुला रहा ऑक्सफोर्ड?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी



एक समय ऐसा था जब ढंग के कपड़े तक नहीं थे। आर्थिक तंगी के कारण उन्हें घर पर सिले-पुराने कपड़े पहनने पड़ते थे। कई किलोमीटर दूर कॉलेज पैदल जाना पड़ता था। साइकिल तक की सुविधा नहीं थी। आज वही शख्स हवाई जहाज में सफर करता है और सालाना १५ करोड़ रुपये का टर्नओवर खड़ा कर चुका है। यह सक्सेस स्टोरी महाराष्ट्र के अमरावती जिले के म्हसाला अंजनगांव बारी गांव के रहने वाले ५७ वर्षीय किसान रवींद्र मानिकराव मेटकर की है।

### ग्लोबल रिसर्च कॉन्फ्रेंस के लिए आमंत्रित

महाराष्ट्र के प्रगतशील किसान रवींद्र मानिकराव मेटकर की प्रेरणादायक कामयाबी को अंतरराष्ट्रीय पहचान भी मिल रही है। उन्हें १ से ५ मई २०२६ तक युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड में 'एआय फॉर एव्हरी माईंड' विषय पर होने वाली ग्लोबल रिसर्च कॉन्फ्रेंस में बतौर अतिथि आमंत्रित किया गया है, जहां वे अपनी सफलता की कहानी छात्रों और विशेषज्ञों के साथ साझा करेंगे। इस कॉन्फ्रेंस में रवींद्र मेटकर अपने अनुभवों को साझा करेंगे। आयोजकों द्वारा भेजे गए आमंत्रण पत्र में कहा गया है कि एक भारतीय कृषि उद्यमी के रूप में उनका अनुभव और योगदान इस सम्मेलन की चर्चाओं को समृद्ध करेगा और विचारों के आदान-प्रदान में अहम भूमिका निभाएगा।

### १०० पक्षियों से शुरू हुआ सफर

रवींद्र मेटकर ने वर्ष १९८४ में, जब वे जूनियर कॉलेज में पढ़ रहे थे, अपने घर की छत से पोल्ट्री फार्मिंग की शुरुआत की. उन्होंने अपने पिता से मिले ३,००० रुपये से यह काम शुरू किया था। उनके पिता वन विभाग में चतुर्थ श्रेणी कर्मचारी थे। शुरुआत में उनके पास सिर्फ १०० पक्षी थे। कॉमर्स में मास्टर डिग्री पूरी करने के बाद उन्हें अपनी मां से चार एकड़ जमीन विरासत में मिली। बाद में परिवार ने यह जमीन बेच दी और अमरावती के बडनेरा में एक एकड़ जमीन खरीदी, जहां उन्होंने अपने काम को आगे बढ़ाया।

### लोन लेकर बढ़ाया कारोबार, फिर मिली बड़ी सफलता

मेटकर ने बैंक से ५ लाख रुपये का लोन लेकर ४,००० पक्षियों के साथ नया पोल्ट्री फार्म शुरू किया. वर्ष २००६ तक उनका कारोबार तेजी से बढ़ा और उनके फार्म में २०,००० पक्षी हो गए. लेकिन उसी साल बर्ड फ्लू के कारण उन्हें बड़ा झटका लगा और कारोबार ठप हो गया। भारी नुकसान के बावजूद उन्होंने हार नहीं मानी। वर्ष २००८ में उन्होंने फिर से २५ लाख रुपये का लोन लिया और नए जोश के साथ काम शुरू किया। उस समय उनके पास २०,००० पक्षी थे, लेकिन धीरे-धीरे हर साल १०,००० पक्षियों की बढ़ोतरी होती गई।

### आज ५० एकड़ में फैला कारोबार, १५ करोड़ का टर्नओवर

आज रवींद्र मेटकर का पोल्ट्री फार्म ५० एकड़ में फैला हुआ है, जिसमें करीब १.८ लाख पक्षी हैं. उनका सालाना टर्नओवर लगभग १५ करोड़ रुपये है और अब उन पर कोई बैंक लोन भी नहीं है। पोल्ट्री के साथ-साथ वे गेहूं, मक्का, केला, आम, संतरा, नींबू, चना और नारियल जैसी फसलों की खेती भी करते हैं। वे ऑर्गेनिक खाद और प्राकृतिक खेती के तरीकों का उपयोग करते हैं, जिससे लागत कम और मुनाफा ज्यादा होता है।

### परिवार का साथ और नई पीढ़ी की भागीदारी

उनके दो भाई और बड़ा बेटा, जो एग्रीबिजनेस मैनेजमेंट की पढ़ाई कर चुका है और अब एमबीए कर रहा है, इस कारोबार में उनका साथ दे रहे हैं। वहीं छोटा बेटा विदेशी यूनिवर्सिटी से कंप्यूटर इंजीनियरिंग में मास्टर डिग्री कर चुका है। अब मेटकर ने अपने फार्म में पक्षियों की संख्या बढ़ाना बंद कर दिया है और वे दूसरे किसानों को मार्गदर्शन देने पर ध्यान दे रहे हैं, ताकि खेती से जुड़ा समाज आगे बढ़ सके।

### देश-विदेश में दे चुके हैं लेक्चर

रवींद्र मेटकर को देश और विदेश के कई कृषि संस्थानों में आमंत्रित किया जा चुका है। वे यूनिवर्सिटी ऑफ सिंगापुर, शेर-ए-कश्मीर यूनिवर्सिटी ऑफ एग्रीकल्चरल साइंसेज एंड टेक्नोलॉजी (जम्मू), महाराष्ट्र यूनिवर्सिटी ऑफ एनिमल एंड फिशरी साइंसेज (नागपुर), आईआईटी भिलाई, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विश्वविद्यालय और भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) जैसे संस्थानों में अपने अनुभव साझा कर चुके हैं।

# 'आयपीओ'च्या नियमांत बदल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) नियम १९५७ मध्ये बदल करून सरकारने मोठ्या कंपन्यांसाठी 'आयपीओ' काढण्याची प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे. या निर्णयाचा दीर्घकालीन परिणाम काय होईल, याबाबत आर्थिक तज्ज्ञांमध्ये विविध मतप्रवाह दिसून येत आहेत.

'आयपीओ'च्या माध्यमातून कंपन्या सार्वजनिक गुंतवणूकदारांकडून निधी उभारतात आणि शेअर बाजारात सूचीबद्ध होतात. मात्र, 'आयपीओ' काढताना कंपन्यांना काही नियमांचे पालन करणे आवश्यक असते. आतापर्यंत कंपन्यांना किमान २५ टक्के शेअर्स सार्वजनिक गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक होते. सरकारने आता या नियमांमध्ये बदल करून मोठ्या कंपन्यांना काही प्रमाणात सवलत दिली आहे.

नवीन नियमांनुसार कंपन्यांच्या बाजारमूल्यानुसार सार्वजनिक शेअरहोल्डिंगची मर्यादा वेगवेगळी ठेवण्यात आली आहे. मोठ्या कंपन्यांना सुरूवातीला कमी सार्वजनिक शेअर देऊनही बाजारात सूचीबद्ध होण्याची मुभा देण्यात आली आहे.

### निर्णयामागील उद्देश

या निर्णयामागील प्रमुख उद्देश म्हणजे भारतीय उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देणे. अनेक मोठ्या कंपन्या आयपीओ काढण्याबाबत सावध असतात, कारण त्यांना कंपनीतील मोठा हिस्सा सार्वजनिक गुंतवणूकदारांना द्यावा लागतो. त्यामुळे कंपनीवरील नियंत्रणावर परिणाम होण्याची शक्यता असते. नवीन नियमांमुळे कंपन्यांना आपले नियंत्रण राखत बाजारातून निधी उभारणे शक्य होणार आहे.

### संभाव्य फायदे

विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रातील स्टार्टअप कंपन्या आणि वेगाने वाढणाऱ्या उद्योगसमूहांना या निर्णयाचा मोठा फायदा होऊ शकतो. भारतात गेल्या काही वर्षांत स्टार्टअप संस्कृती झपाट्याने वाढत आहे. अनेक कंपन्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्या तरी शेअर बाजारात सूचीबद्ध होण्यासाठी काही अडचणी येत होत्या. सरकारच्या या निर्णयामुळे अशा कंपन्यांना बाजारात येण्याची अधिक संधी मिळेल. याचा सकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारावरही होऊ शकतो. मोठ्या आणि नावाजलेल्या कंपन्या बाजारात आल्यास गुंतवणूकदारांचा विश्वास वाढतो. त्यामुळे बाजारात तरलता वाढते आणि अधिक गुंतवणूक आकर्षित होते. तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारतीय बाजार अधिक आकर्षक ठरू शकतो.

### संभाव्य धोके

मात्र, या निर्णयाकडे केवळ सकारात्मक दृष्टीने पाहणे पुरेसे नाही. काही अर्थतज्ज्ञांच्या मते, सार्वजनिक शेअरहोल्डिंग कमी असल्यास बाजारातील पारदर्शकतेवर परिणाम होऊ शकतो. जर कंपनीतील बहुतांश शेअर्स काही मोजक्या व्यक्ती किंवा गटांच्या नियंत्रणाखाली राहिले, तर सामान्य गुंतवणूकदारांचे प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता आहे. तसेच बाजारातील किमतींच्या स्थैर्यावरही याचा परिणाम होऊ शकतो. सार्वजनिक शेअर्सची संख्या कमी असल्यास शेअरच्या किमतींमध्ये अधिक चढ-उतार होण्याची शक्यता असते. त्यामुळे नियामक संस्था आणि बाजार नियंत्रकांनी या बदलांवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

### संतुलन राखण्याचा प्रयत्न

सरकारने या बाबींचा विचार करून एक महत्त्वाची अट घातली आहे. नवीन नियमांनुसार, मोठ्या कंपन्यांना सुरुवातीला कमी सार्वजनिक शेअर्स देण्याची मुभा असली, तरी तीन वर्षांच्या आत सार्वजनिक शेअरहोल्डिंग 25 टयांपर्यंत वाढवणे बंधनकारक असेल. त्यामुळे बाजारातील संतुलन आणि गुंतवणूकदारांचे हित जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्था सध्या वेगाने वाढत आहे. या वाढीस चालना देण्यासाठी उद्योग क्षेत्र आणि भांडवली बाजार यांच्यात मजबूत संबंध असणे आवश्यक आहे. सरकारने 'आयपीओ'च्या नियमांमध्ये केलेला बदल हा त्या दिशेने टाकलेला एक महत्त्वाचा टप्पा आहे. तथापि, कोणताही आर्थिक निर्णय केवळ उद्योगवाढीसाठी नसून तो गुंतवणूकदारांचे संरक्षण आणि बाजारातील पारदर्शकता यांनाही तितकेच महत्त्व देणारा असावा. त्यामुळे या बदलांची अंमलबजावणी करताना नियामक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# मराठी सिनेमा व्हेंटिलेटरवर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सध्याच्या कालखंडात १०० पेक्षा जास्त मराठी चित्रपट प्रदर्शित होतात. मात्र, त्यातील हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच सिनेमे चित्रपटगृहात जेमतेम दोन-चार आठवडे टिकतात, हे वास्तव आहे. त्यामुळे कधीकाळी रसिकांची गर्दी खेचणारा मराठी सिनेमा आता व्हेंटिलेटरवर आहे का, अशी शंका येऊ लागली आहे.

मराठी चित्रपट चालण्यामध्ये एकपडदा (सिंगल स्क्रीन) चित्रपटगृहांचा मोठा वाटा होता. कोरोनानंतर राज्यातील बहुतांश एकपडदा चित्रपटगृहे बंद पडली आहेत. त्याचा परिणाम व्यवसायावर झाल्याची कबुली निर्माते देतात. मात्र, खरे कारण शोधायचे झाले तर अनेक बाबी लक्षात येतातचांगल्या चित्रपटांना योग्य थिएटर मिळत नाही, प्राइम टाइम शो मिळत नाही, मल्टिप्लेक्सचे महागडे तिकीट, तेच ते विषय, हौशी निर्माते-दिग्दर्शक, केवळ अनुदानासाठी केलेली निर्मिती, लोकप्रिय चित्रपटांचे अनुकरण, नावीन्याचा अभाव, तांत्रिक कमतरता, अपयशी मार्केटिंगअशी मोठी यादी मराठी चित्रपटांच्या अपयशाला कारणीभूत ठरते.

थोडक्यात दरवर्षी प्रदर्शित होणाऱ्या १०० हून अधिक चित्रपटांपैकी सुमारे ९५ चित्रपट प्रदर्शनानंतरच्या पहिल्या तीन दिवसांतच उतरतात, ही चिंतेची बाब आहे. मराठी रसिकांना आपल्या मातृभाषेवर प्रेम आहे, हे खरे; पण ते चित्रपटगृहात जाऊन मराठी सिनेमा का पाहत नाहीत, हा प्रश्न अनेक निर्मात्यांना पडतो. हा फक्त प्रेक्षकांच्या अनास्थेचा प्रश्न नाही. बदलते तंत्रज्ञान, वितरण व्यवस्था आणि जागतिक स्पर्धेत आपण मागे पडत आहोत का, याचा विचार करणे आवश्यक आहे.

### आशय आणि विषयांची पुनरावृत्ती

आशयप्रधान सिनेमा ही मराठी चित्रपटांची ओळख होती; परंतु सध्या तेच तेच विषय पुन्हा पुन्हा येत असल्याने प्रेक्षक कंटाळले आहेत. मध्यमवर्गीय प्रेक्षकांना जोडणारा कंटेंट कमी दिसतो. वास्तववादी सिनेमाची अपेक्षा असताना त्याचे उथळ अनुकरण अधिक दिसते. आजचा प्रेक्षक केवळ मराठी सिनेमा पाहत नाही; तो नेटफ्लिक्स, प्राइम, डिस्नी हॉटस्टार यांसारख्या प्लॅटफॉर्मवर जागतिक दर्जाचा कंटेंट पाहतो. त्यामुळे त्याची अभिरुची उंचावली आहे. याची जाणीव निर्मात्यांनी ठेवणे आवश्यक आहे.

### वितरणाचे दुष्टचक्र

मराठी चित्रपटांना अनेकदा प्राइम टाइम मिळत नाही. मल्टिप्लेक्समध्ये हिंदी किंवा इंग्रजी चित्रपटांना प्राधान्य दिले जाते आणि मराठी चित्रपटांना सकाळचे किंवा दुपारचे शो दिले जातात. कामकाजात व्यस्त असलेल्या प्रेक्षकांना या वेळा सोयीस्कर नसतात.

### मार्केटिंगचा अभाव

चित्रपट निर्मितीसाठी मोठा खर्च केला जातो; पण त्याच्या प्रसिद्धीसाठी मात्र पुरेसा खर्च केला जात नाही. परिणामी, अनेक चित्रपट प्रदर्शित होऊनही लोकांना त्याची माहितीही नसते.

### OTT आणि बदललेली प्रेक्षकवृत्ती

कोरोनानंतर OTT प्लॅटफॉर्मवर चित्रपट पाहण्याची सवय वाढली आहे. त्यामुळे प्रेक्षक मोठ्या बजेटच्या चित्रपटांनाच थिएटरमध्ये पाहतात. इतर चित्रपट OTT वरच पाहण्याकडे कल वाढला आहे.

### नवोदित निर्मात्यांचे आव्हान

अनेक निर्माते केवळ छंद म्हणून चित्रपट बनवतात. त्यांना तांत्रिक, वितरण आणि व्यवसायिक बाबींचे पुरेसे ज्ञान नसते. त्यामुळे दर्जाहीन चित्रपट तयार होतात आणि ते अपयशी ठरतात. मराठी चित्रपटसृष्टीत प्रचंड क्षमता आहे. मात्र, बदलत्या काळानुसार विषय, तंत्रज्ञान, मार्केटिंग आणि वितरण यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. अन्यथा मराठी सिनेमा इतिहासजमा होण्याची भीती नाकारता येणार नाही.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# श्रीराम नवमी कधी साजरी करणार २६ की २७ मार्चला?

## यंदा नवमी तिथी दोन दिवस; जाणून घ्या श्रीराम नवमीची नेमकी तारीख काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला भगवान प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्म झाला होता. तो पावन दिवस सर्वत्र भक्त मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करतात. हिंदू धर्मात या दिवसाला अत्यंत महत्त्व प्राप्त आहे. भगवान विष्णूंचा सातवा अवतार असलेल्या प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस धार्मिकदृष्ट्या देखील विशेष आहे. या दिवशी सर्व श्रीराम मंदिरांत भगवान प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेची किंवा मूर्तीची विधिवत पूजा केली जाते. रामायणाचा पाठ या दिवशी केला जातो तसेच भगवान श्रीराम यांच्या नामाचे निरंतर स्मरण भक्त करतात. श्रीराम नवमीच्या दिवशी चैत्र नवरात्रीची



सांगता होते. मात्र यंदा नवमी तिथी दोन दिवस असल्याने श्रीराम नवमी नक्की २६ की २७ मार्च २०२६ ला साजरी करायची याबाबत संभ्रम आहे. जाणून घ्या श्रीराम नवमीची नेमकी तारीख.

### श्रीराम नवमी तारीख

श्रीराम नवमी तिथी प्रारंभ २६ मार्च २०२६ सकाळी ११ वाजून ४६ मिनिटांनी

श्रीराम नवमी तिथी समाप्ती २७ मार्च २०२६ सकाळी १० वाजून ०७ मिनिटांनी

भगवान श्रीरामांचा जन्म हा मध्यान्ह काळात झाल्याने श्रीराम नवमी ही २६ मार्च २०२६ रोजी साजरी केली जाईल. मात्र २७ मार्च २०२६ रोजी उदय तिथीनुसार काही ठिकाणी श्रीराम नवमी साजरी करण्यात येईल.

### श्रीराम नवमीचा शुभ मुहूर्त

२६ मार्च २०२६ दुपारी : नवमी तिथी : मध्यान्ह मुहूर्त ११.१३ पासून ते १.४१ पर्यंत

श्रीराम नवमी जन्मकाळ दुपारी : १२.२५

### श्रीराम नवमीला पूजा कशी कराल?

श्रीराम नवमीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान झाल्यानंतर स्वच्छ वस्त्र परिधान करावे. त्यानंतर घरातील देवांची पूजा करावी. श्रीरामांचा फोटो किंवा मूर्तीवर अभिषेक करावा. मूर्तीला गंध लावून हार, फुले अर्पण करावीत. धूप-दीप, उदबत्ती लावून पूजा करावी. गोड नैवेद्य दाखवावा व प्रभू श्रीरामचंद्र यांची आरती म्हणून पूजा करावी. यावेळी तुम्ही श्रीरामस्तुतीचा पाठ करावा तसेच श्रीरामनामाच्या १ ते ११ माळा जप करावा. अखंड रामायणाचे पठण करावे. दुपारी मध्यान्ह काळात श्रीरामांचा पाळणा घरात हलवून श्रीराम नवमीचा जन्मोत्सव साजरा करावा.

**आयंबिल ओली प्रारंभ विशेष**

# तप, संयम आणि आत्मशुद्धीचा पवित्र मार्ग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जैन धर्मीयांच्या आध्यात्मिक परंपरेत अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला आयंबिल ओली हा तप, संयम आणि आत्मशुद्धीचा पवित्र पर्व म्हणून ओळखला जातो. वर्षातून दोन वेळा येणारा हा उत्सव श्रद्धा, साधना आणि आत्मानुशासन यांचा अनोखा संगम घडवून आणतो.

### आयंबिल ओली म्हणजे काय?

'आयंबिल' म्हणजे अतिशय साधा आणि निरामिष आहार ज्यामध्ये मसाले, तेल, तूप, साखर यांचा पूर्णतः त्याग केला जातो. 'ओळी' म्हणजे सलग दिवस. या कालावधीत साधक सलग नऊ दिवस अत्यंत साध्या आहाराचे पालन करत तपश्चर्या करतात. याला 'नवपद ओली' असेही म्हटले जाते.

### धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व

आयंबिल ओली ही केवळ उपवासाची परंपरा नसून आत्मशुद्धीचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. या काळात जैन धर्मीय नवपदांची (अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधू, सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, सम्यक चारित्र, तप) उपासना करतात. या साधनेतून मन, वाणी आणि कर्म यांचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो.

### तप आणि संयमाची साधना

या नऊ दिवसांत साधक एक वेळ साधा आहार घेतात आणि उर्वरित वेळ ध्यान, जप, स्वाध्याय आणि धार्मिक प्रवचनात व्यतीत करतात. शरीरावर नियंत्रण ठेवत आत्मिक उन्नती साधणे, हीच या पर्वाची खरी ओळख आहे. आयंबिल ओलीमुळे संयम, सहनशीलता आणि आत्मनियंत्रण यांचे महत्त्व जीवनात रुजते.

### सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू

आयंबिल ओलीच्या निमित्ताने समाजात धार्मिक वातावरण निर्माण होते. मंदिरांमध्ये विशेष पूजा, प्रवचने आणि सामूहिक साधना आयोजित केली जाते. या काळात दानधर्म, सेवा कार्य आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होते. समाजातील सर्व स्तरांतील लोक एकत्र येऊन अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव घेतात.

### आधुनिक काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या जीवनात मनःशांती आणि आत्मचिंतनासाठी वेळ मिळणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आयंबिल ओलीसारखे पर्व मनाला स्थैर्य देतात. साधेपणा, शिस्त आणि आत्मनियंत्रण या मूल्यांची जाणीव करून देत हा उत्सव आधुनिक जीवनशैलीतही संतुलन निर्माण करण्यास मदत करतो. आयंबिल ओली हा केवळ धार्मिक विधी नसून जीवनशैली सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. तप, त्याग आणि संयम यांच्या माध्यमातून आत्मिक प्रगती साधण्याची संधी या पर्वात मिळते. या पवित्र पर्वाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या जीवनात साधेपणा आणि सदाचार यांचा अवलंब करणे, हीच खरी त्याची शिकवण आहे.

# भारतासह महाराष्ट्रातील दिव्यता : श्रीराम जन्मोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





भारत हा श्रद्धा, परंपरा आणि उत्सवांचा देश असल्याने श्रीराम नवमी हा भगवान श्रीराम यांच्या जन्माचा पवित्र सोहळा देशभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. चैत्र महिन्यातील शुक्ल नवमीला साजरा होणारा हा उत्सव धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. रामायणमधील आदर्श व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीरामांच्या जन्मदिनानिमित्त देशातील अनेक ठिकाणी भव्य आणि दिव्य स्वरूपात उत्सव साजरे होतात.

### अयोध्या : श्रीराम जन्मभूमीतील भव्य सोहळा

उत्तर प्रदेशातील अयोध्या हे प्रभू श्रीराम यांचे जन्मस्थान मानले जाते आणि येथे श्रीराम नवमी सर्वाधिक भव्यतेने साजरी होते. अयोध्या येथील श्रीराम मंदिरात लाखो भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते. श्रीराम नवमीच्या दिवशी विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, श्रीराम जन्मसोहळा आणि 'सूर्य तिलक' यांसारखे अनोखे धार्मिक कार्यक्रम पार पडतात. मंदिर परिसर सजवला जातो आणि लाखो दिव्यांनी संपूर्ण अयोध्या उजळून निघते. दरवर्षी लाखो भक्त येथे येऊन पवित्र शरयू नदीत स्नान करतात आणि रामललांचे दर्शन घेतात.

### वाराणसी आणि उत्तर भारतातील उत्सव

वाराणसी, प्रयागराज यांसारख्या शहरांमध्ये श्रीराम नवमीच्या निमित्ताने रामलीला, शोभायात्रा आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मंदिरांमध्ये रामायणाचे अखंड पठण केले जाते आणि भक्तिभावाने वातावरण भारलेले असते.

### महाराष्ट्रातील श्रीराम नवमी उत्सव

नाशिक- पंचवटीचे धार्मिक महत्त्व

नाशिक येथील पंचवटी हे श्रीरामांच्या वनवासाशी संबंधित पवित्र स्थान आहे. येथे श्रीराम नवमी मोठ्या भक्तिभावाने साजरी होते. पंचवटीतील श्रीराम मंदिरांमध्ये विशेष पूजा, कीर्तन आणि भजन कार्यक्रम आयोजित केले जातात. या ठिकाणाचे धार्मिक महत्त्व इतके मोठे आहे की श्रीराम मंदिराशी संबंधित अनेक विधीही येथे पार पडले आहेत.

### औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

औरंगाबाद येथेही श्रीराम नवमीनिमित्त भव्य मिरवणुका काढल्या जातात. विविध सामाजिक आणि धार्मिक संस्थांच्या माध्यमातून कीर्तन, प्रवचन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

### मुंबई आणि पुणे

मुंबई आणि पुणे या महानगरांमध्ये श्रीराम नवमी मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. मंदिरांमध्ये विशेष सजावट, भजन-कीर्तन, रामरथ यात्रा आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

### रायगड आणि इतर भाग

रायगड जिल्ह्यात श्रीराम नवमीच्या निमित्ताने भव्य मूर्ती अनावरण, मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. याशिवाय राज्यातील अनेक गावांमध्ये ग्रामस्तरावर श्रीराम जन्मसोहळा, हरिकीर्तन आणि सामूहिक पूजा यांचे आयोजन केले जाते.

### उत्सवाचे वैशिष्ट्य

श्रीराम नवमीच्या दिवशी दुपारी १२ वाजता श्रीरामांचा जन्मसोहळा साजरा केला जातो. मंदिरांमध्ये घंटानाद, शंखध्वनी आणि जयघोषात श्रीराम जन्म साजरा होतो. अनेक ठिकाणी रामरथ यात्रा, पालखी सोहळे आणि दानधर्माचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

### आधुनिक काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या जीवनात श्रीराम नवमीसारखे उत्सव समाजाला एकत्र आणतात. श्रीरामांच्या आदर्श जीवनातून सत्य, धर्म, कर्तव्य आणि नैतिकता यांचे महत्त्व अधोरेखित होते. हा उत्सव केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक परंपरेचा जप करणारा आहे. भारतासह महाराष्ट्रात रामनवमी उत्सव अत्यंत भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरा केला जातो. अयोध्यापासून नाशिकपर्यंत प्रत्येक ठिकाणी भक्तिभाव, उत्साह आणि श्रद्धेचा अनोखा संगम पाहायला मिळतो. भगवान श्रीरामांच्या आदर्शांचा वारसा जपत हा उत्सव भारतीय संस्कृतीची ओळख अधिक दृढ करतो.

# चैतन्य महाप्रभुओं के जीवन की हृदयस्पर्शी कथा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैतन्य महाप्रभुओं के जीवन की एक बहुत ही हृदयस्पर्शी कथा है, जो प्रेम और विनम्रता की शक्ति को दर्शाती है। यह कथा 'जगाई और मधाई' के उद्धार की है।

### जगाई-मधाई और महाप्रभु की करुणा

नवद्वीप में दो भाई रहते थेजगाई और मधाई। वे बहुत बड़े अपराधी, शराबी और हिंसक थे। पूरा नगर उनसे थर-थर कांपता था।

### १) नित्यानंद प्रभु का संकल्प

चैतन्य महाप्रभु के प्रिय शिष्य, नित्यानंद प्रभु, अत्यंत दयालु थे। उन्होंने सोचा कि यदि इन दोनों पापियों का हृदय परिवर्तन हो जाए, तो महाप्रभु की "नाम-संकीर्तन" की महिमा पूरी दुनिया में फैल जाएगी।

### २) वह हिंसक घटना


एक दिन जब नित्यानंद प्रभु गलियों में हरि-नाम का प्रचार कर रहे थे, उनका सामना जगाई और मधाई से हो गया। मधाई ने गुस्से में आकर एक मिट्टी के मटके का टुकड़ा नित्यानंद प्रभु के सिर पर दे मारा, जिससे उनके माथे से खून बहने लगा। नित्यानंद प्रभु ने क्रोधित होने के बजाय बड़े प्रेम से कहा- "तुमने मुझे मारा तो क्या हुआ, कम से कम एक बार मुख से 'कृष्ण' का नाम तो ले लो!"

### ३) चैतन्य महाप्रभु का आगमन

जब महाप्रभु को पता चला कि उनके प्रिय भक्त को चोट लगी है, तो वे अत्यंत क्रोधित हो गए और अपना 'सुदर्शन चक्र' आह्वान करने लगे। वे उन पपियों को दंड देना चाहते थे। लेकिन नित्यानंद प्रभु ने महाप्रभु के पैर पकड़ लिए और विनती की, "प्रभु! इस कलियुग में शस्त्र से नहीं, प्रेम से संहार कीजिये। ये अज्ञानी हैं, इन्हें क्षमा कर दें।"

### ४) हृदय परिवर्तन

नित्यानंद प्रभु की यह निस्वार्थ करुणा देखकर जगाई और मधाई के पत्थर जैसे दिल पिघल गए। वे महाप्रभु के चरणों में गिर पड़े और फूट-फूट कर रोने लगे। उन्होंने अपने सभी पापों की क्षमा मांगी। महाप्रभु ने उन्हें गले लगा लिया और वे दोनों भाई महान भक्त बन गए। उन्होंने प्रतिज्ञा की कि वे जीवन भर गंगा के किनारे घाट की सफाई करेंगे और हर आने-जाने वाले भक्त की सेवा करेंगे।



### इस कथा की सीख

चैतन्य महाप्रभु की यह कथा सिखाती है कि क्रोध को प्रेम से जीता जा सकता है। महाप्रभु ने दिखाया कि सच्ची भक्ति और विनम्रता बड़े से बड़े अपराधी का जीवन भी बदल सकती।

**चैत्र नवरात्रोत्सव...**

# नऊ दिवस राशीनुसार देवीला अर्पण करा या वस्तू; होणार नवदुर्गांची कृपा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र नवरात्रीची सुरूवात झाली असून या नऊ दिवसांत देवी दुर्गेची भक्तगण विधिवत पूजा करतात. देवीचा आवडता नैवेद्य आणि साजशृंगार देवीला या दिवसांत अर्पण करतात. मात्र जर राशीनुसार देवीला काही गोष्टी चैत्र नवरात्रीत अर्पण केल्या, तर देवी प्रसन्न होऊन कृपा करतात, अशी मान्यता आहे.

ज्योतिषशास्त्रात ग्रहांना फार महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक राशीचा स्वतःचा एक स्वामी ग्रह असतो जो त्या राशीचे संचालन करतो. हा स्वामी ग्रह त्या राशीच्या व्यक्तीच्या स्वभावावर आणि नशिबावर प्रभाव टाकतो. त्यामुळे तुम्ही जर तुमच्या राशीनुसार देवतांची पूजा केली तर त्याचा दुप्पट लाभ मिळू शकतो, असे म्हणतात. चैत्र नवरात्रीत देखील जर आपल्या राशीनुसार देवीला काही वस्तू अर्पण केल्या तर देवीची कृपा प्राप्त होऊन ग्रहांची अनुकूलता सुद्धा मिळते. तसेच जगदंबेची विशेष कृपा आपल्या जीवनावर आणि कुटुंबावर राहते. जाणून घ्या राशीनुसार चैत्र नवरात्रीत देवीला कोणत्या वस्तू अर्पण कराव्यात.



### मेष

या राशीचा स्वामी तेजस्वी मंगळ ग्रह आहे. मंगळ हा ऊर्जा आणि पराक्रमाचा ग्रह मानला जातो. नवरात्रीच्या पूजेदरम्यान, मेष राशीच्या लोकांनी देवीला गुलाब, जास्वंद, इतर लाल रंगाची फुले आणि लाल रंगाचे वस्त्र अर्पण करावे. यामुळे देवीची कृपा प्राप्त होते.



### वृषभ

ही एक भौतिक रास आहे. जिचा स्वामी शुक्र ग्रह आहे. शुक्र ग्रह धन, सौंदर्य आणि ऐश्वर्याचा कारक मानला जातो. नवरात्रीमध्ये यश मिळवण्यासाठी आणि धन-धान्याची वाढ होण्यासाठी देवीला पांढऱ्या रंगाची साडी अर्पण करावी.

### मिथुन



ही एक व्यावहारिक रास आहे, जिचा स्वामी बुध ग्रह आहे. बुध ग्रह बुद्धिमत्ता, संवाद आणि व्यापाराचा कारक आहे. मिथुन राशीच्या लोकांनी देवीला हिरव्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे व गरजू विद्यार्थ्यांना वाचनाचे किंवा लेखनाचे साहित्य भेट दिल्यास लाभ मिळतो. तसेच यामुळे बुधाचा शुभ प्रभाव वाढतो.

### कर्क



ही एक जल तत्त्वाची रास आहे जिचा स्वामी चंद्र आहे. चंद्र मन, भावना आणि कुटुंबाचा कारक मानला जातो. घर-कुटुंबात सुख-शांती टिकून राहण्यासाठी, कर्क राशीच्या लोकांनी देवीला पांढरे वस्त्र अर्पण करावे. यामुळे चंद्राचा शुभ प्रभाव वाढतो आणि घरात शांतता व आनंद नांदतो.

### सिंह



या राशीचा स्वामी सूर्य असल्यामुळे ही एक ऊर्जावान रास आहे. सूर्य हा तेज, नेतृत्व आणि आत्मविश्वासाचा कारक आहे. नवरात्रीमध्ये पूजेसोबतच, सिंह राशीच्या लोकांनी देवीला लाल वस्त्र, लाल फुले, लाल चंदन, मध, केसर, शुद्ध तूप, कुंकू इत्यादी वस्तू अर्पण कराव्यात.

### कन्या



ही दुहेरी स्वभावाची रास आहे जिचा स्वामी बुध ग्रह आहे. बुध ग्रह बुद्धिमत्ता आणि विश्लेषणाचा कारक आहे. नवरात्रीमध्ये देवीला हिरव्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे. यामुळे बुधाचा शुभ प्रभाव वाढतो आणि बुद्धी क्षमता सुधारते.



### तूळ

ही एक संतुलित रास आहे जिचा स्वामी शुक्र आहे. शुक्र ग्रह सौंदर्य, प्रेम आणि समतोलाचा कारक आहे. नवरात्रीच्या पूजेमध्ये तुळ राशीच्या लोकांनी देवीला पांढऱ्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे. यामुळे शुक्राचा शुभ प्रभाव वाढतो आणि जीवनात संतुलन व आनंद येतो.



### वृश्चिक

ही एक साहसी रास आहे जिचा स्वामी मंगळ आहे. मंगळ हा धैर्य, ऊर्जा आणि संरक्षणाचा कारक आहे. नवरात्रीमध्ये पूजेसोबतच, वृश्चिक राशीच्या लोकांनी देवीला लाल ओढणी (चुनरी) अर्पण करावी.



### धनु

ही एक धनुर्धारी रास आहे जिचा स्वामी बृहस्पती ग्रह आहे. बृहस्पती हा ज्ञान, समृद्धी आणि भाग्याचा कारक आहे. देवीला पिवळ्या रंगाची मिठाई आणि केळीचा नैवेद्य दाखवावा. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये एखाद्या धर्मस्थळी धार्मिक पुस्तकांचे दान करावे. यामुळे बृहस्पतीचा आशीर्वाद मिळतो आणि जीवनात ज्ञान व समृद्धी येते.



### मकर

ही शनी प्रधान कर्तव्यनिष्ठ रास आहे. शनी हा कर्म, शिस्त आणि न्यायाचा कारक आहे. नवरात्रीच्या पूजेमध्ये मकर राशीच्या लोकांनी देवीला तपकिरी रंगाच्या वस्त्रांनी शृंगार करावा. यामुळे शनीचा शुभ प्रभाव वाढतो आणि जीवनात स्थिरता व यश येते.



### कुंभ

नवरात्रीच्या पूजेमध्ये कुंभ राशीच्या लोकांनी देवीसमोर नारळा फोडावा ज्यामुळे आयुष्यातील अडचणी दूर होतात. नारळाचा प्रसाद घरातील सर्व सदस्यांमध्ये वाटावा. रुद्राक्षाच्या माळेने देवीच्या मंत्रांचा जप करावा. यामुळे शनीचा शुभ प्रभाव वाढतो आणि जीवनातील अडथळे दूर होतात.



### मीन

ही बृहस्पती प्रधान जल तत्त्वाची रास आहे. बृहस्पती हा अध्यात्म, करुणा आणि विस्ताराचा कारक आहे. मीन राशीच्या लोकांनी मातेला केसरयुक्त पिवळ्या रंगाच्या मिठाईचा नैवेद्य दाखवावा. देवीचा शृंगार पिवळ्या वस्त्रांनी करावा. हे उपाय बृहस्पतीचा आशीर्वाद मिळवून देतात आणि जीवनात शांती व प्रगती होते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)